# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल


**शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जि.रायगड-४१० २०६.**

ई-मेल पत्ता :- jdhe.pnvl-mah@gov.in Website: http://jdhepanvel.org
दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२-२७४५३८२०)


जा.क्र.: विससं/उशि/कोविप/शिष्यवृत्ती/२०१९/ 1865 दि. 2/9/19

प्रति,

**प्राचार्य/संस्था प्रमुख,**
सर्व अशासकीय अनुदानित व विना-अनुदानित, कायम विना-अनुदानित
कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व अध्यापक महाविद्यालये,
जि. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग.

विषयः **अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना सन २०१९-२० च्या अंमलबजावणीबाबत...**

संदर्भ: मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.उशिसं/शिष्यवृत्ती/पीएमएस/२०१९-२०/ १०७९२, दि.२०.०८.२०१९

उपरोक्त विषयांबाबत कळविण्यात येते मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौध्द, पारशी व जैन या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकोत्तर (Post Matric) शिक्षणाकरीता केंद्र शासन पुरस्कृत मॅट्रीकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजना सन २०१९-२० साठी राज्यामध्ये राबविण्यात येत आहे. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी विद्यार्थ्यांचे नवीन (Fresh) व नुतनीकरण (Renewal) करण्यासाठी www.scholarship.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षामध्ये महाराष्ट्र राज्यासाठी नवीन (Fresh) शिष्यवृत्तीसाठी ४७५७५ संच निर्धारित केलेले आहेत. केंद्रशासनामार्फत नवीन शिष्यवृत्तीसाठी व नुतनीकरणासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत **३१ ऑक्टोबर २०१९** अशी निर्धारित करण्यात आलेली आहे. तसेच महाविद्यालये / संस्था यांना अर्जांची छाननी करुन अर्ज पुढील स्तरावर Forward करण्याचा अंतिम **दि.१५ नोव्हेंबर २०१९** आहे. पोस्ट मॅट्रीक अल्पसंख्यांक शिष्यवृत्तीची सविस्तर माहिती, अर्ज करण्याची पध्दत, संकेतस्थळ तसेच इतर अनुषंगिक माहितीबाबत मा. संचालनालयाच्या वतीने राज्यातील प्रमुख वृत्तपत्रांमधून जाहिरात देऊन त्यास प्रसिध्दी देण्यात येत आहे. तसेच सदर जाहिरात मा. संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर सुध्दा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर संकेतस्थळावर केंद्रशासनाकडून प्राप्त झालेल्या Standard Operating Procedure (SOP), Guidelines, Frequently Asked Questions (FAQs) for Post Matric Scholarship for Minorities तसेच वेळोवेळी प्राप्त झालेली इतर माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

मार्गदर्शक सुचना (Guidelines) व FAQs काळजीपूर्वक वाचून त्यानुसार सर्व महाविद्यालयांनी कार्यवाही करावी. तसेच सदर योजनेबाबतच्या केंद्रशासनाकडील नवीन सुधारीत प्राप्त सूचनांसाठी www.scholarship.gov.in या संकेतस्थळाचे व मा. संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळाचे विद्यार्थी व महाविद्यालयांनी वेळोवेळी अवलोकन करावे.

महाविद्यालय / संस्था यांनी त्यांच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जात नमूद केलेला त्यांचा आधार क्रमांक त्यांच्या बँक खात्याशी लिंक केलेला असल्याची खात्री करावी. आधार क्रमांक बँक खात्याशी लिंक केलेला नसल्यास तो लिंक करण्याबाबत विद्यार्थ्यांना सूचना देण्यात याव्यात. विद्यार्थ्यांनी अर्ज करतांना त्यांचा आधार क्रमांक ज्या बँक खात्याशी शेवटी लिंक केलेला आहे तोच बँक खाते क्रमांक अर्जात नमूद करावा अशा सूचना सर्व विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात.

**एखाद्या विद्यार्थ्याकडे आधार कार्ड नसेल तर त्याऐवजी त्या विद्यार्थ्याने आधार नोंदणी आयडी स्लिप किंवा बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची स्वतःच्या फोटोसह असलेलली छायांकित प्रत किंवा पॅन कार्ड अथवा ड्रायव्हिंग लायसन्सची प्रत अथवा प्राचार्यांची सही व शिक्का असलेले विद्यार्थ्यांच्या ओळखीबाबतचे स्वतःच्या फोटोसह असलेले प्रमाणपत्र इत्यादी पैकी एका कागदपत्राची छायांकित प्रत सर्व कागदपत्रांसह जोडण्याबाबत सूचना देण्यात याव्यात.**

महाविद्यालये / संस्थांनी रु.५०,०००/- पेक्षा कमी शिष्यवृत्ती रक्कम असलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जासोबतची कागदपत्रे ऑनलाईन Upload न करता काटेकोरपणे तपासून ऑनलाईन अर्ज तपासून पुढील कार्यवाही करावी व सदर कागदपत्रे महाविद्यालय स्तरावर जतन करुन ठेवावीत. तसेच रु.५०,०००/- पेक्षा जास्त शिष्यवृत्ती रक्कम असलेल्या अर्जासोबतची कागदपत्रे ऑनलाईन अर्जासोबत Upload करणे आवश्यक आहे.

ज्या विद्यार्थ्यांना मागील वर्षात नवीन मंजूरीसाठी शिष्यवृत्ती मंजूर झालेली आहे. त्या विद्यार्थ्यांनी त्यांचा **अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत नुतनीकरणाचाच अर्ज भरण्याच्या** सूचना महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात.

महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन अर्जांची कागदपत्रांसह तपासणी करुन मंजूर केलेले पात्र अर्ज पुढील टप्प्यावर विनाविलंब ऑनलाईन फॉरवर्ड करावेत. अर्ज फॉरवर्ड करण्यासाठी अंतिम दिनांकाची वाट पाहू नये.

केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्यासाठी निर्धारित केलेले नवीन शिष्यवृत्तीचे संच पूर्ण करण्याची जबाबदारी ही सर्व महाविद्यालयांवर आहे. यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही आपल्या स्तरावरुन करण्यात यावी. **सदर योजनेची माहिती महाविद्यालयाचे नोटीस बोर्डवर / वेबसाईटवर प्रसिध्द करावी, महाविद्यालयाच्या दर्शनी जागेवर बॅनर लावावेत. तसेच महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थ्यांकरिता कार्यशाळा / बैठका घेऊन या योजनेचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना लाभ होईल यासाठी प्रयत्न करणे व विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करणे.**

RSDhemmasker

विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

प्रत: मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सादर.